# विद्यापीठात जातीआधारित भेदभाव प्रतिबंध समिती स्थापन

## १२ सदस्यांचा समावेश; यूजीसीच्या पत्रानुसार कार्यवाही

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) पत्रातील सूचनेनुसार विद्यापीठ अधिकार मंडळाने केलेल्या ठरावाने शिवाजी विद्यापीठाने १२ सदस्यीय जातीआधारित भेदभाव प्रतिबंध समितीचे गठण केले आहे.

तत्कालीन प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमरकर यांनी वनस्पतीशास्त्र विभागातील प्रा. डॉ. एन. बी. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली १२ सदस्यांची समिती नेमली आहे. जातीआधारित भेदभाव होत असेल तर त्याबाबतची लेखी तक्रार तक्रारदाराने संबंधित अधिविभाग प्रमुख, प्रशासकीय विभागप्रमुखांकडे पाठवावी. विभाग प्रमुखांनी तक्रारीचे निराकरण त्यांच्या पातळीवर करून त्याबाबतचा लेखी अहवाल मूळ



तक्रारीसह अध्यक्षांकडे पाठवावा. अधिविभागप्रमुख, प्रशासकीय विभागप्रमुख यांच्या स्तरावर त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारीचे निराकरण न झाल्यास तक्रारदाराने कार्यवाही अहवाल जातीआधारित भेदभाव प्रतिबंध समितीचे अध्यक्ष, विशेष कक्ष यांच्याकडे पाठवावा, असे कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी परिपत्रकात म्हटले आहे.

**समितीमधील सदस्य**

प्रा. डॉ. एन. बी. गायकवाड, वनस्पतीशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ (अध्यक्ष); एल. टी. भिसे, व्यवस्थापन परिषद सदस्य; डॉ. एस. यू. मन्ने, प्राणीशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ; प्राचार्य डॉ. ए. आर. गाडे, मिनलबेन मेहता महाविद्यालय, पाचगणी; प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर, कमला कॉलेज, कोल्हापूर; डॉ.ए. एस. सरवदे, इंग्रजी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ; डॉ. एस. टी. कोंबडे, अर्थशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ; डॉ. एस. ए. कीर्तने, यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स, कराड; प्रा. डॉ.शिवाजी पाटील, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा; आनंद खामकर, अति. महासचिव, महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ; दीपक शिंदे, पदवी वितरण विभाग, शिवाजी विद्यापीठ; शिवाजी विद्यापीठ विशेष कक्षाचे उपकुलसचिव डॉ. पी. एस. पांडव हे सदस्य सचिव असतील.

# ऑनलाईन, ऑफलाईन नोंदणी सोमवारपर्यंतच

कोल्हापूर, ता. ११ : अंतिम वर्षाची परीक्षा ऑनलाईन की ऑफलाईन देणार हे नोंदवण्याचा अंतिम दिवस सोमवारी (ता. १२) आहे. सायंकाळी पाच वाजेपर्यंतच ही नोंदणी करता येणार आहे. जे नोंदणी करणार नाहीत, त्यांना त्यांच्या महाविद्यालयात अथवा अधिविभागत जाऊन बहुपर्यायी प्रश्नपत्रिका सोडवावी लागेल, अशी माहिती परीक्षा विभागाचे संचालक गजानन पळसे यांनी जाहीर आवाहन करणारे पत्रक प्रसिद्ध करून दिली. 'अंतिम वर्षांच्या परीक्षांना लवकरच सुरवात होणार आहे. ही परीक्षा ऑनलाईन आणि ऑफलाईन दोन्ही प्रकारे होणार आहे; मात्र विद्यार्थ्यांना ऑनलाईन की ऑफलाईन परीक्षा देणार याची नोंदणी करणे बंधनकारक आहे.

एकूण ७४,०११ विद्यार्थ्यांपैकी १० हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली नाही. त्यांनी सोमवारपर्यंत (ता. १२) नोंदणी करावी. अन्यथा त्यांना त्यांच्या महाविद्यालयात जाऊन बहुपर्यायी प्रश्नपत्रिकेच्या माध्यमातून परीक्षा द्यावी लागेल.

# अंतिम वर्षाच्या परीक्षांची तयारी सुरू

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा शनिवार, दि. १७ ते ३१ ऑक्टोबर या कालावधीमध्ये घेतल्या जाणार आहेत. या परीक्षांची तयारी विद्यापीठाच्या परीक्षा विभागातर्फे युद्धपातळीवर सुरू आहे. कोणत्याही अडचणी विनाऑनलाईन परीक्षा पार पाडण्याचे आव्हान विद्यापीठाच्या परीक्षा विभागासमोर आहे.

कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत ही अंतिम वर्षाची परीक्षा घेण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले. ३१ ऑक्टोबरपर्यंत परीक्षा घेऊन १० नोव्हेंबरपूर्वी निकाल लावण्याच्या सूचना विद्यापीठांना देण्यात आल्या आहेत. या



परीक्षांची तयारी सुरू असतानाच कर्मचाऱ्यांतर्फे कामबंद आंदोलन पुकारण्यात आले. त्यामुळे परीक्षांच्या कामकाजावर परिणाम झाला. त्यामुळे वेळेत परीक्षा पूर्ण करण्यासाठी तीन सत्रांमध्ये अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यात येणार आहेत.

विद्यापीठातर्फे अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑनलाईन की ऑफलाईन पद्धतीने, याची निवड करण्यासाठी ▶▶ पान २ वर

# नूतन कुलगुरूंसमोर आव्हाने आणि संधीही!

## कोल्हापूरचे सुपुत्र डॉ. शिर्के कुलगुरूपदावर विराजमान; विद्यापीठाची दिशा बदलण्याचे आव्हान

**कोल्हापूर : राजेंद्र जोशी**

सोशल इंजिनिअरिंग, राजकीय पक्षांना पूरक विचारसरणी अशा संकल्पना रूजू झालेल्या भारतासारख्या देशात विद्वत्ता असूनही कुलगुरूपदाची संधी गमावलेल्या विद्वानांची संख्या थोडीथोडकी नाही. मग ज्या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये आपली जडणघडण झाली, दीर्घकाळ अध्यापनासह विविध पदे भूषविण्याची संधी मिळाली, अशा व्यक्तीला त्याच विद्यापीठाच्या कुलगुरूपदी संधी मिळणे ही गोष्ट तर दुर्मिळातील दुर्मीळ समजली जाते. शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र विभागाचे प्रमुख माजी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी हा दुग्धशर्करा योग संपादन केला आहे.



शिवाजी विद्यापीठातून...

डॉ. शिर्के यांच्यावर हितचिंतक आणि गुणीजनांकडून कौतुकाचा वर्षाव होणे हे तर स्वाभाविकच. परंतु, बहुजनांचे विद्यापीठ म्हणून ओळख असलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू पदाच्या खुर्चीवर विराजमान होताना त्यांच्यासमोर उभ्या असलेल्या अनेक आव्हानांचे स्मरण करून देणे ही एक गरज निर्माण झाली आहे. या आव्हानांचा यशस्वीपणे मुकाबला करून डॉ. शिर्के यांनी त्याचे संधीत रुपांतर करण्याचे काम केले तर डॉ. शिर्के यांचे नाव विद्यापीठाच्या इतिहासात कोरले जाऊ शकते.

डॉ. शिर्के हे हातकणंगले तालुक्यातील वाठारचे. महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केल्यानंतर १९९० च्या दशकात त्यांनी शिवाजी विद्यापीठात पाऊल ठेवले. विद्यार्थी वसतिगृहातील विद्यार्थ्यांपासून ते प्र-कुलगुरूपदापर्यंत गेले ३० वर्षे ते या विद्यापीठाशी संबंधित आहेत. एक मितभाषी प्राध्यापक, दक्ष प्रशासक म्हणून ओळख असलेल्या डॉ. शिर्के यांनी विद्यापीठाच्या अधिकार मंडळांवर काम केले आणि गेली पाच वर्षे प्र-कुलगुरू म्हणूनही विद्यापीठात कार्यरत होते. यामुळे विद्यापीठाच्या समस्यांपासून खाचाखळग्यांपर्यंत त्यांना विविध प्रश्नांची जाणीव आहे आणि जाण आहे. तसेच विद्यापीठ क्षेत्रामध्ये शिरकाव झालेल्या राजकारणांपासून ते दबावगटाच्या पाळेमुळांची त्यांना चांगलाच परिचय आहे. अशा विद्यापीठाची तीन दशकांची वाटचाल जवळून पाहणाऱ्या व्यक्तीला कुलगुरूपदाची संधी मिळणे ही काही साधीसुधी गोष्ट नाही. कदाचित मर्यादांच्या बंधनांमुळे त्यांना कालपर्यंत विद्यापीठाची दिशा बदलण्यासाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात अडचणी जाणविल्याची शक्यताही नाकारता येत नाही. तथापि, आता कुलगुरू पदावर विराजमान झाल्यानंतर मात्र विद्यापीठाची दिशा बदलण्याचे आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिमा निर्माण करण्याचे एक मोठे आव्हान उभे आहे. हे आव्हान ते किती समर्थपणे पेलतात याविषयी आता सर्वांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत.

(पूर्वार्ध)

### आव्हानांचे संधीत रुपांतर करण्याची गरज

'नॅक', 'एनआयआरएफ' या मूल्यांकनासाठी धडपड एवढ्यासाठीच की, देशातीलच काय जगभरातील शिक्षणाची परिमाणे बदलत आहेत. गुणांवर आधारित शिक्षण आणि रोजगार या संकल्पना आता कालबाह्य ठरू पाहत आहेत. देशात नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर झाले आहेच. शिवाय विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे आता नॅशनल क्रेडिट बँकही तयार झाली आहे. यापुढचे शिक्षण हे ऑनलाईन पद्धतीचे, दूरशिक्षण व्यवस्थेतील असणार आहे आणि 'क्रेडिट' या शिक्षण पद्धतीत यापुढे विद्यापीठांचे वर्गीकरणही तीन गटांमध्ये केले जाणार आहे. यामध्ये संशोधनाला पूर्णतः वाहून घेतलेले विद्यापीठच व्यवस्थेमध्ये चिरंतन टिकू शकते हे सत्य स्वीकारले तर डॉ. शिर्के यांना शिवाजी विद्यापीठाच्या विविध विज्ञान शाखांमध्ये संशोधनाची दारे खुली करावी लागतील.

# 'परीक्षा पर्याय' देण्याचा आज अंतिम दिवस

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** अंतिम सत्र, वर्षाची परीक्षा ऑनलाईन अथवा ऑफलाईन पद्धतीने देण्याचा पर्याय निवडण्याच्या मुदतीमधील आज, सोमवार हा अखेरचा दिवस आहे. विद्यार्थ्यांनी हा पर्याय शिवाजी विद्यापीठाकडे ऑनलाईन नोंदवायचा आहे. या परीक्षेसाठी ज्या विद्यार्थ्यांनी त्यांचा मोबाईल क्रमांक, ई मेल हा महाविद्यालय, अधिविभागाच्या वतीने विद्यापीठाच्या संगणक प्रणालीमध्ये अद्ययावत केलेला नाही, ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा पद्धतीबाबतचा पर्याय निवडलेला नाही, अशा विद्यार्थ्यांनी आज, सोमवारी सायंकाळी पाचपूर्वी पर्यायाची नोंद करावी. जे विद्यार्थी पर्याय निवडणार नाहीत, त्यांना महाविद्यालय अथवा अधिविभागामध्ये प्रत्यक्ष हजर राहून एमसीक्यू पद्धत या स्वरूपाने परीक्षा देणे बंधनकारक असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी सांगितले.

पुण्य नगरी

# अंतिम वर्षाच्या परीक्षांची तयारी सुरू

**(पान १ वरून)** विद्यापीठातर्फे ऑप्शन फॉर्म भरण्याची व्यवस्था विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. ज्या विद्यार्थ्यांनी हा फॉर्म भरलेला नाही, त्यांनी तातडीने तो भरण्याचे आवाहन विद्यापीठ प्रशासनातर्फे करण्याता आले. ऑनलाईन पद्धतीच्या परीक्षेसाठी सॉफ्टवेअर हाताळणीचे प्रशिक्षण परीक्षा विभाग तसेच महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना देण्यात येणार आहे. मुंबई विद्यापीठाच्या परीक्षांदरम्यान डिस्टन्स एज्युकेशनचे नऊ हजार विद्यार्थी परीक्षा देत असताना देखील पाच लाख जणांनी हे पेज ओपन करण्याचा प्रयत्न केला होता. तांत्रिक अडचणी तसेच सायबर हल्ला रोखण्याचे आव्हान परीक्षा विभागासमोर आहे.